| | |
|---|---|
| **MHST130016282023** | रे.दि.मु.नं.४२८/२०२३<br>नंदा देसाई वगैरे वि. पोपट उदुगडे वगैरे |

**नि.दि.मु.क्र. ४२८/२०२३ मधील निशाणी ३४ व ३६ वरील आदेश**

सदरहू अर्ज वादीतर्फे मयत प्रतिवादी क्र.१ पोपट नारु उदुगडे यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेल्या विलंब माफीचा व अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता दाखल केला आहे. सदर अर्जाच्या पुष्टयर्थ वादीने शपथपत्र दाखल केले आहे.

२. वादीचे विद्वान विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, मयत प्रतिवादी क्र.१ पोपट नारु उदुगडे हे दि.२३/०३/२०२५ रोजी मयत झाले आहेत. सदर प्रतिवादी क्र.१ च्या मृत्युचे नोंदीची माहिती व उतारे त्यांना वेळेत उपलब्ध झाले नाहीत. वादी हे बाहेरगावी राहत असल्यामुळे व सतत आजारी असल्यामुळे त्यांना प्रतिवादी नं. १ यांचे वारस सामिल करणे मुदतीत शक्य झाले नाही. झालेला विलंब हा हेतू पुरस्सर नाही. दावा गुणदोषावर चालविण्याकरीता सदरचा अर्ज मंजूर करणे अत्यंत गरजेचे आहे. अर्ज मंजूर न केल्यास वादींचे कधीही न भरून निघणारे नुकसान होणार आहे. याउलट, अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

३. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. मयत प्रतिवादी क्र.१ पोपट नारु उदुगडे यांचे मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता, ते दि. २३/०३/२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. सदरचा अर्ज दि. २७/०६/२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदरचा अर्ज दाखल करणेस अंदाजे ३ महिने ४ दिवसांचा विलंब झालेला आहे. कायदयाचे स्थापित तत्वानुसार विधिज्ञांचे अनावधानाचा दोष पक्षकारास देणे न्यायोचित होणार नाही. करीता, अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबा बाबतचे समाधानकारक स्पष्टीकरण अर्जामध्ये नमूद करण्यात आलेले नाही. सदरचा दावा सरस व निरस मानाने वाटप करुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये अचल संपत्तीबाबतच्या महत्वाच्या अधिकारांचे वाद प्रश्न अंतर्भुत आहेत. परिणामस्वरूप, सदरचे अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालील आदेश.

**<u>– : आ दे श :–</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज (निशाणी ३४ व ३६) मंजूर करण्यात येतो.

२) मयत प्रतिवादी क्र.१ पोपट नारु उदुगडे यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब हा येणेप्रमाणे माफ करण्यात येतो.

३) प्रतिवादी क्र.१ यांचे विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश येणेप्रमाणे रद्द करण्यात येतो.

पाटण (आर.एम.लोळगे)

दि. २६/०८/२०२५. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाटण.